**हर्णेश्वर साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारासंदर्भात चौकशी करण्याबाबत साखर आयुक्त यांच्या अध्यतेखाली समिती गठीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- ससाका- २०२५ /प्र.क्र.५२ /२२-स,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०७ /०५/२०२६

**<u>प्रस्तावना :-</u>**

श्री. ज्ञानदेव (माऊली ) हरिभाऊ चवरे, इंदापूर तालूका अध्यक्ष भाजपा व सदस्य जिल्हा नियोजन समिती पुणे, मु. कडबनवाडी, पो. शेळगांव, ता. इंदापूर, जि. पुणे यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविलेल्या दिनांक १५/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये हर्णेश्वर साखर कारखाना आर्थिक घोटाळयाची चौकशी करुन श्री जिगर प्रदिप चंद शहा, लिक्विडेटर यांच्यावर त्वरीत गुन्हा दाखल करण्याची विनंती केली आहे. त्यानुषंगाने हर्णेश्वर साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारासंदर्भात चौकशी करण्याबाबत साखर आयुक्त यांच्या अध्यतेखाली समिती गठीत करण्याबाबत तसेच सदर समितीने हर्णेश्वर साखर कारखान्यांच्या आर्थिक व्यवहाराबाबत सखोल चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

हर्णेश्वर साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारासंदर्भात चौकशी करण्याबाबत साखर आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेण्यात येत आहे. त्यानुसार साखर आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सदर समिती गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :-

| | | |
|---|---|---|
| १) | साखर आयुक्त, पुणे | अध्यक्ष |
| २) | प्रादेशिक सहसंचालक (साखर),पुणे | सदस्य सचिव |
| ३) | उपविभागीय अधिकारी बारामती, उपविभाग,बारामती | सदस्य |
| ४) | सह जिल्हा निबंधक, पुणे | सदस्य |
| ५) | विभागीय उपनिबंधक, इंदापुर | सदस्य |
| ६) | जिल्हा उपनिबंधक, पुणे | सदस्य |
| ७) | पोलीस निरीक्षक, बारामती | सदस्य |

सदर समितीने हर्णेश्वर साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारासंदर्भात तात्काळ उचित चौकशी करुन याबाबतचा अहवाल एक महिन्यात शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०५०७१५२८४६४२०२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH
PANDURANG
SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD,
2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C8
1F8C437078A333B7111446A2, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B
569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH
PANDURANG SHINGADE
Date: 2026.05.07 15:32:03 +05'30'

**(अंकुश पां. शिंगाडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) प्रधान सचिव, सहकार यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे.
५) उपविभागीय अधिकारी बारामती, उपविभाग,बारामती.
६) सह जिल्हा निबंधक, पुणे.
७) विभागीय उपनिबंधक, इंदापुर.
८) जिल्हा उपनिबंधक, पुणे.
९) पोलीस निरीक्षक, बारामती.
१०) निवड नस्ती (कार्यासन २२-स) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय मुंबई.